**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१८९ व १९०/०२**

**श्री. शशिकांत वामन कोचीकर**
**७ ओम, सतलज इर्ला,**
**विलेपार्ले (प), मुंबई ४०० ०५६.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा**
**संचालक (अभियांत्रिकी सेवा आणि प्रकल्प)**
**३ रा मजला, विस्तार भवन,**
**महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अभियंता (इमारत प्रस्ताव)**
**३ रा मजला, विस्तार भवन,**
**महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.शशिकांत कोचीकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६(१) अनुसार जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अभियंता, (इमारती प्रस्ताव) यांचेकडे अर्ज करुन भायखळा विभागातील सीटी सर्व्हे क्र. (प्लॉट क्र.) २३३ व २३४ धारण करणा-या भुखंडाचे क्षेत्र निर्देशांक वाढवून दाखविल्याच्या गैरव्यवहारात सहभाग झाल्याबद्दल लाचलुचपत प्रतिबंध विभागाने (ACB) तपासणी करिता इमारती प्रकल्प विभागाच्या ताब्यात घेतलेल्या एकूण ४७ फाईल्स प्रत्यक्ष पाहाणी करिता उपलब्ध करुन देण्याची व आवश्यक कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रतींची अपिलकाराने मागणी केली होती. लाचलुचपत प्रतीबंधक विभागाकडे प्रकरण तपासाधीन असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ८(१) (एच) अनुसार जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अभियंता, मनपा यांनी दि.०७.०१.२००६ च्या पत्रान्वये माहिती नाकारली. जन माहिती अधिका-यांने दिलेल्या उत्तराने व्यथित होवून अपिलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-यांकडे दि.३१.०१.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांने सदर अपिलावर सुनावणी आयोजित करुन दि.१५.०२.२००६ रोजी आदेश पारित केले. यामुळे अपिलकाराचे समाधान झाले नसल्याने त्यांनी केंद्रीय माहितीचा

अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपिलाची सुनावणी दि.०७.११.२००८ रोजी आयोजित करण्यात आली. सुनावणी करिता प्रथम अपिलीय प्राधिकारी, जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

भायखळा विभागातील सीटी सर्व्हे क्र. (प्लॉट क्र.) २३३ व २३४ धारण करणा-या भुखंडाचे क्षेत्र वाढीव दाखवून त्याव्दारे लबाडीने चटईक्षेत्र निर्देशांक वाढवून दाखविल्याच्या गैरव्यवहारात सहभाग झाल्याबद्दल लाचलुचत प्रतिबंध विभागाने (ACB) तपासणीकरिता इमारत प्रकल्प विभागाच्या ताब्यात घेतलेल्या एकूण ४७ फाईल्स प्रत्यक्ष पाहाणीकरिता उपलब्ध करुन देण्याची व आवश्यक कागदपत्राच्या छायाप्रतीची मागणी केली होती. चटईक्षेत्र निर्देशांक वाढवून दाखविल्याच्या गैरव्यवहारात सहभाग झाल्याबद्दल लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अपीलकार श्री.कोचीकर व इतर अधिका-याविरूध्द भ्रष्टाचार निर्मुलन अधिनियम (१) ८ डी शहर भारतीय दंड विधान कलम १२०८ (बी) सह वायावयाच्या कलम ४२०, ४६५ ते ४६८, ४७१, ४७७ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हयाची १९८४ तक्रार नोंदणी क्र.२७ नोंदवून मुंबईच्या विशेष सत्र न्यायालयात १९८७ विशेष प्रकरण क्र.९ खटला दाखल केला होती. मान. विशेष सत्र न्यायालयाने दि.१७.०१.२००१ च्या निकालाव्दारे श्री.कोचीकर यांनी दोषी ठरविण्यात आले असून त्यांना तीन वर्ष सक्षम कारावास व दोन हजार रु.२०००/- (दोन हजार फक्त) चा दंड व दंड न भरल्यास दोन महिने सक्षम कारावास अशी शिक्षा ठोठाविण्यात आली आहे.

सदर शिक्षेविरूध्द श्री.कोचीकर यांनी मुंबई उच्च न्यायालयात फौजदारी दावा क्र.२०७/२००१ दाखल करुन अपिल दाखल केले आहे व सदर अपील प्रलंबित आहे.

केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ८(१) (एच) मधील तरतूद लक्षात घेता, प्रकरण मा.उच्च न्यायालयात प्रलंबित असल्याने तसेच अपिलकारास हवी असलेली माहिती संबंधीच्या सर्व मूळ फाईल्स ॲन्टी करप्शन ब्युरोकडे आहेत. तेव्हा जन माहिती अधिकारी / अपिलीय

प्राधिकारी यांनी अपीलकारास दिलेले उत्तर समर्पक वाटते. सदर परिस्थितीत मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**<u>आदेश</u>**

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**

**दिनांक ०६.०५.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१७८८/०२**

**श्री. संजय पांगम,**
**हशू निवास, ४०२, बी विंग,**
**४ था मजला, २८thX२८th रोड,**
**वांद्रे (प.), मुंबई- ४०० ०५०.** **-----अपीलकार.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपनिबंधक सहकारी संस्था, एच/पश्चिम विभाग,**
**सहकार बाजार, ४ था मजला,**
**वांद्रे (प.), मुंबई- ४०० ०५०.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उपनिबंधक सहकारी संस्था, एच/पश्चिम विभाग,**
**सहकार बाजार, ४ था मजला,**
**वांद्रे (प.), मुंबई- ४०० ०५०.** **-----उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. संजय पांगम यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.९.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, एच/पश्चिम विभाग, सहकार बाजार, वांद्रे (प.) मुंबई, यांच्याकडे दि.१२.६.२००८ रोजी अर्ज करुन, हशू निवास सहकारी गृह. संस्थेच्या १३ थकबाकीदार सदस्यांविरुध्द उपनिबंधक यांच्यापुढे आयोजित केलेल्या सुनावणीच्या आदेशाची प्रत तसेच १३ थकबाकीदार सदस्याकडील वसुली प्रमाणपत्राच्या प्रतीची मागणी केली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०७.८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०२.२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, एच/पश्चिम विभाग, सहकार बाजार, वांद्रे (प.) मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, हशू निवास सहकारी गृह. संस्थेच्या १३ थकबाकीदार सदस्यांविरुध्द उपनिबंधक यांच्यापुढे आयोजित केलेल्या सुनावणीच्या आदेशाची प्रत तसेच १३ थकबाकीदार सदस्याकडील वसुली प्रमाणपत्राच्या प्रतीची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. दोन्ही अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

## आदेश

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :- ०६.०५.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१३१२/०२**

**श्री. अशोककुमार मारूती शिंदे**
**अवंती अंबर इमारत**
**अंबर तळमजला, ना.दा.रोड,**
**मलबारहिल, मुंबई ४०० ००६.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अधिक्षक अभियंता**
**मुंबई सार्वजनिक बांधकाम मंडळ,**
**२५, मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप अधिक्षक अभियंता**
**मुंबई सार्वजनिक बांधकाम मंडळ,**
**२५, मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.अशोककुमार मारूती शिंदे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०७.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन मंजूर केलेली कामाची यादी, बेरोजगार अभियंता / मंजूर संस्था / निविदा पध्दतीने शासनाच्या आदेशानुसार मंडळाअंतर्गत सन २००७ ते आजपर्यंत कामाची विभागणी करुन काम दिले आहे काय? उप विभाग / शाखावार मंजूर केलेली कामे नियमानुसार मिळालेले अनुदान किती? जास्त अनुदान खर्च करतांना शासनाची परवानगी घेतली का? याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर पारित केलेल्या आदेशान समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२२.०४.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणी करिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन बेरोजगार अभियंता / मंजूर संस्था / निविदापध्दतीने विभागणी केलेल्या कामाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. जन माहिती अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ७ चा भंग झाला आहे. याकरिता जन माहिती अधिका-यांना जबाबदार धरुन त्यांच्या विरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अन्वये शास्ती का? लाढण्यात येउ नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत आयोगाकडे प्रत्यक्ष भेटून लेखी खुलासा सादर करावा.

**<u>आदेश</u>**

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ०६.०५.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१८१७/०२**

**श्री. जयेश अरविंद सेवक**
**श्री. अरविंद माणिलाल सेवक**
**१२०, जयप्रकाश रोड, एन.एस.पाटील मार्ग,**
**(धोबीघाट गल्ली), सेवक अपार्टमेंट्सच्या मागे,**
**कमला अपार्टमेंटच्या समोर, अंधेरी (प),**
**मुंबई ४०० ०५८. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**के/प विभाग कार्यालय, पालीराम पथ,**
**अंधेरी (प), मुंबई ४०० ०५८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**के/प विभाग कार्यालय, पालीराम पथ,**
**अंधेरी (प), मुंबई ४०० ०५८. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.जयेश अरविंद सेवक यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.११.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.२०.०९.२००७ रोजी अर्ज करुन खालीलप्रमाणे माहिती मागीतील होती.

१) सेवक अपार्टमेंट सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या इमारतीचे बांधीव क्षेत्र किती आहे याची मजल्यानुसार विगतवारी

२) या इमारतीत तळ मजला व पहिला मजला घरगुती वापरात येतो अथवा व्यापारी वापरात येतो.

३) या इमारतीत सद्या वापरात असलेल्या तळ मजल्याचे बांधीव क्षेत्र किती आहे.

४) या इमारतीत सद्या तळमजल्याचा वापर व्यापारासाठी होत आहे असे दिसते. तसेच पहिल्या मजल्यावरही असेच चित्र दिसते.

वरीलप्रमाणे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२३.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१६.०४.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन सेवक अपार्टमेंट सहकारी गृहनिर्माण संस्थेबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती उक्त अधिनियमातील तरतुदीचा भंग करणारी आहे. राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे अता अपीलकारास माहिती द्यावी. भविष्यात प्रथम अपीलावर सुनावणी आयोजित करून आवश्यक ते आदेश पारित करण्याची दक्षता घ्यावी अशी प्रथम अपिलीय प्राधिका-यांना समज देण्यात येत आहे. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत अपीलकारास माहिती दिलेली नाही. यामुळे त्यांना जबाबदार धरून उक्त अधिनियमातील कलम २० अन्वये जन माहिती अधिका-यांविरुध्द शास्ती का? लादण्यात येउ नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत जन माहिती अधिका-यांनी प्रत्यक्ष भेटून आयोगास लेखी खुलासा सादर करावा.

## आदेश

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक ०६.०५.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२०२५/०२**

**श्री. संजय गोंविद धुवाळी**
**४/३४५ रचना नवि, चिखलवाडी,**
**एन.बी.मार्ग, ग्रॅन्ट रोड (प), मुंबई ४०० ००७.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**'इ' वॉर्ड ऑफिस, भायखळा,**
**मुंबई ४०० ००८.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**'इ' वॉर्ड ऑफिस, भायखळा,**
**मुंबई ४०० ००८.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.संजय धुवाळी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.११.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.२२.०९.२००८ रोजी अर्ज करुन न्यु गांजावाला टॉवर येथील अनधिकृत गाळयाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१२.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२२.०४.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-याचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन न्यू गांजावाला टॉवर, साने गुरुजी मार्ग, ताडदेव, मुंबई ३४ येथील पार्किंगच्या जागी गाळे बांधून विकाल्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. गाडी खाली घेउन जाण्यासाठी असलेली लिफट पुर्णत: बंद करुन त्या ठिकाणीही गाळा बांधण्यात आला. सदर गाळे बांधकामास महानगरपालिकेने परवानगी दिल्याची प्रत, अनधिकृतपणे महानगरपालिकेच्या परवानगीशिवाय बांधकाम केले असल्यास ते तोडावे. सदर ठिकाणी संयुक्त पाहणी आयोजित करावी. रहिवाश्यांना त्रास होत असल्याबाबत जन माहिती अधिका-याकडे अपीलकाराने अर्ज करुन वर नमुद माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही तर प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल करुन आवश्यकती माहिती प्राप्त करुन घेण्याची उक्त अधिनियमात अपीलकारास एक संधी आहे. सदर प्रकरणी अपीलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले होते. परंतू प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसाचे आत सदर प्रकरणी आवश्यक ते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल करण्याचा अपीलकाराचा हक्क अबाधित राहील.

## आदेश

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक ११.०५.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२९०/०२**

**श्री. शशिकांत डब्लू. कोचीकर**
**७ ओम, सतलज इर्ला,**
**विलेपार्ले (प), मुंबई ४०० ०५६.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा संचालक,**
**अभि.सेवा व प्रकल्प बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**३ रा मजला, विस्तारीत इमातर, महापालिका मुख्यालय,**
**फोर्ट, मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**नगर अभियंता यांचे मध्यवर्ती कार्यालय,**
**५ वा मजला, विस्तारीत इमातर, महापालिका मुख्यालय,**
**फोर्ट, मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.एस. कोचीकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयेगाकडे दि.२८.०२.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.११.०९.२००६ रोजी माहितीच्या अधिकारात अर्ज करुन आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे एकूण १५ अर्ज केले होते. त्यावर आयुक्त कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची माहिती मागीतली होती.

अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी दि.१३.१०.२००६ च्या पत्रान्वये माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०१.१२.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.०३.०१.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती नगर अभियंता यांनी दि.२७.१०.२००६ च्या पत्रान्वये तसेच विधी अधिका-यांनी दि.१७.११.२००६ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती दिली असल्याचे नमुद करुन दि.०८.०१.२००७ रोजी आदेश पारित करुन अपील निकालात काढले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०७.११.२००८ रोजी सुनावणी

आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन त्यांच्या एकूण १५ अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागीतली होती. कार्यालयात जीकाही कागदपत्र उपलब्ध होती त्याआधारे शहर अभियंता यांनी दि.२७.१०.२००६ च्या पत्रान्वये माहिती दिली. विधि अधिकारी यांनी अपीलकारास दि.१७.११.२००६ च्या पत्रानुसार माहिती दिली आहे. भायखळा विभागातील सीटी सर्व्हे क्र.२३३ व २३४ धारण करणा-या भुखंडाचे क्षेत्र वाढीव दाखवून त्याव्दारे लबाडीने चटइक्षेत्र निर्देशांक वाढवून दाखविल्याच्या गैरव्यवहारात अपीलकार व इतर अधिकारी यांच्या विरुध्द विशेष सत्र विरुध्द विशेष सत्र न्यायालयात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने खटला दाखल केला होता. मा.विशेष सत्र न्यायालयाने अपीलकारास दोषी ठरविले असून त्यांना समक्ष कारावासाची शिक्षा ठोठावली आहे. सदर शिक्षेविरुध्द अपीलकार यांनी मुंबई उच्च न्यायालयात अपील दाखल केले आहे व सदर अपील प्रलंबित आहे. अपीलकारास हवी असलेली माहिती संबंधीच्या सर्व मूळ फाईल्स लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे आहेत असे जन माहिती अधिका-यांनी अपील क्र.१८९ व १९० च्या सुनावणीवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. जन माहिती अधिका-यांनी कार्यालयात असलेली उपलब्ध माहिती पुरविली आहे. यावरुन अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्षक उत्तर दिले. असल्याने प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ११.०५.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२९०/०२**

**श्री. शशिकांत डब्लू. कोचीकर**
**७ ओम, सतलज इर्ला,**
**विलेपार्ले (प), मुंबई ४०० ०५६.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा संचालक,**
**अभि.सेवा व प्रकल्प बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**३ रा मजला, विस्तारीत इमातर, महापालिका मुख्यालय,**
**फोर्ट, मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**नगर अभियंता यांचे मध्यवर्ती कार्यालय,**
**५ वा मजला, विस्तारीत इमातर, महापालिका मुख्यालय,**
**फोर्ट, मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.एस. कोचीकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयेगाकडे दि.२८.०२.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.११.०९.२००६ रोजी माहितीच्या अधिकारात अर्ज करुन आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे एकूण १५ अर्ज केले होते. त्यावर आयुक्त कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची माहिती मागीतली होती.

अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी दि.१३.१०.२००६ च्या पत्रान्वये माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०१.१२.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.०३.०१.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती नगर अभियंता यांनी दि.२७.१०.२००६ च्या पत्रान्वये तसेच विधी अधिका-यांनी दि.१७.११.२००६ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती दिली असल्याचे नमुद करुन दि.०८.०१.२००७ रोजी आदेश पारित करुन अपील निकालात काढले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०७.११.२००८ रोजी सुनावणी

आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन त्यांच्या एकूण १५ अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागीतली होती. कार्यालयात जीकाही कागदपत्र उपलब्ध होती त्याआधारे शहर अभियंता यांनी दि.२७.१०.२००६ च्या पत्रान्वये माहिती दिली. विधि अधिकारी यांनी अपीलकारास दि.१७.११.२००६ च्या पत्रानुसार माहिती दिली आहे. भायखळा विभागातील सीटी सर्व्हे क्र.२३३ व २३४ धारण करणा-या भुखंडाचे क्षेत्र वाढीव दाखवून त्याव्दारे लबाडीने चटइक्षेत्र निर्देशांक वाढवून दाखविल्याच्या गैरव्यवहारात अपीलकार व इतर अधिकारी यांच्या विरुध्द विशेष सत्र विरुध्द विशेष सत्र न्यायालयात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने खटला दाखल केला होता. मा.विशेष सत्र न्यायालयाने अपीलकारास दोषी ठरविले असून त्यांना समक्ष कारावासाची शिक्षा ठोठावली आहे. सदर शिक्षेविरुध्द अपीलकार यांनी मुंबई उच्च न्यायालयात अपील दाखल केले आहे व सदर अपील प्रलंबित आहे. अपीलकारास हवी असलेली माहिती संबंधीच्या सर्व मूळ फाईल्स लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे आहेत असे जन माहिती अधिका-यांनी अपील क्र.१८९ व १९० च्या सुनावणीवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. जन माहिती अधिका-यांनी कार्यालयात असलेली उपलब्ध माहिती पुरविली आहे. यावरुन अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्षक उत्तर दिले. असल्याने प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ११.०५.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२४५९/०२**

**श्री. जगन्नाथ शर्मा**
**चंद्रीकाबाई एच. शर्मा चाळ,**
**खार जवाहर नगर, साईबाबा रोड,**
**खार (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/पूर्व वार्ड ऑफिस,**
**प्रभात कॉलनी, १ ला मजला,**
**सांताक्रुझ (पू), मुंबई ४०० ०५५.**

**जन माहिती अधिकारी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/पूर्व वार्ड ऑफिस,**
**प्रभात कॉलनी, १ ला मजला,**
**सांताक्रुझ (पू), मुंबई ४०० ०५५.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.जगन्नाथ एच. शर्मा यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.०२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.१५.११.२००८ रोजी अर्ज करुन चंद्रीकाबाई एच.शर्मा चाळ येथील अनधीकृत फेरफार बांधकामाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

झोपडी गणना २००० अंतर्गत देण्यात आलेल्या ओळखपत्र रद्द करणेकामी उप जिल्हाधिकारी कार्यालयाकडून कार्यवाही चालू आहे. ओळखपत्रे पूर्णत: रद्द झाली किंवा कसे याबाबत अभिप्राय मागविण्यात आले आहेत. याबाबत अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर वैद्यनीक पध्दतीचा अवलंब करुन पुढील कारवाई करण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०१.१२.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे दि.२४.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय

अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२८.०४.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन सीटी सर्व्हे क्र.५६ येथील खोली क्र.२७ व २८ मध्ये फेरफार करुन अनधीकृतरित्या विटाची भिंत बांधली. सदर अनधीकृत बांधकाम पाडून टाकण्याबाबत अपीलकाराने मागणी केली आहे. उप जिल्हाधिकारी (अ.नि.) बांद्रा यांचे कार्यालयामार्फत झोपडी गणना २००० अंतर्गत खेरवाडी मतदार संघात ओळखपत्रे देण्यात आली आहेत. सदर झोपडपट्टी खाजगी घोषीत गलिच्छ वस्ती म्हणून उप जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी बांद्रा यांनी घोषित केलेली असल्याने ओळखपत्र वितरित केली आहेत. महाराष्ट्र स्लम ट्रिब्यूनल यांचेकडील अपील क्र.७१/१९९२, आदेश दि.०७.०७.१९९५ व अपील क्र.१६०/९१ आदेश दि.०८.०६.१९९२ अन्वये सदर झोपडपट्टी गलिच्छ वस्ती मधून वगळण्यात आली आहे. सदर ठिकाणी देण्यात आलेली ओळखपत्रे रद्द करणेकामी उप जिल्हाधिकारी कार्यालयाकडून कार्यवाही चालू आहे. सदर ओळखपत्रे पूर्णत: रद्द झाल्यानंतर पुढील कारवाई महानगरपालिका अधिनियमाअंतर्गत करण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी व्दितीय अपीलाच्या सुनावणीवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन जनन्नाथ शर्मा चाळ, साईबाबा रोड, खार (पू) येथील अपीलकाराच्या पोट भाडेकरु श्री.नारायण टी.नाईक आणि श्री.पी.एस.परब यांनी अनधीकृतपणे केलेल्या बांधकामावर कारवाई करण्यात येईल असे दिसून येते. सदर बाब केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत मोडत नाही. अपीलकाराच्या मागणीप्रमाणे अनधीकृत बांधकाम पाडण्याची कारवाई झाली नाही तर अपीलकाराने सक्षम प्राधिकरणाकडे सदर प्रकरणी दाद मागावी. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक १३.०५.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२४५५/०२**

**श्री. पराग कोठावळे**
**बिल्डींग क्र.६, खोली क्र.४३,**
**तळ मजला, म्हाडा-उन्नतनगर नं.४,**
**संक्रमण शिबीर, म.गांधी मार्ग,**
**आझार मैदाना समोर, गोरेगांव (प),**
**मुंबई ४०० ०६२.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**जिल्हाधिकारी मुंबई शहर यांचे कार्यालय,**
**जुने जकात घर, शहिद भगतसिंग मार्ग,**
**फोर्ट, मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधीक्षक, नगर रचना भूमापन अधिकारी**
**जिल्हाधिकारी मुंबई शहर यांचे कार्यालय,**
**जुने जकात घर, शहिद भगतसिंग मार्ग,**
**फोर्ट, मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.पराग अ.कोठावळे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.११.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.२९.०८.२००८ रोजी अर्ज करुन प्लाझ्मा सिनेमा समोर, न.चि.केळकर मार्ग, इमारत क्र.३३२-३४० अब्दूल रहिमान बिल्डींग, प्लॉट क्र.९९ सी.टी.सर्व्हे क्र.२७२ बाबत प्रमुख अभियंता (विकास नियोजन) यांच्याकडून प्राप्त झालेले पत्र व नकाशाची सत्य प्रत प्रमुख अभियंता (विकास नियोजन) यांना केलेल्या फेरबदलाचा अर्ज व त्यावर आलेले उत्तर इत्यादी अनुषंगीक माहिती मागीतली होती

अपीलकारास हव्या असलेल्या मिळकत पत्रिका अथवा नकाशा सत्यप्रति लिपीच्या ख-या नकला मिळण्याकरिता एकूण ७ बाबीची पुर्तता करण्याबाबत दि.०९.०९.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे

समाधान झाले नाही तर अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल करणे आवश्यक होते. परंतू अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येत नाही. दि.२४.१०.२००८ रोजी निर्णय मिळाला एवढाच उल्लेख केला आहे. निर्णयाची प्रत अपीलासोबत सादर केलेली नाही. इमारत धोकादायक आहे. इमारतीला मोठमोठे तडे गेले आहेत. भाडोत्री इमारत पाडू देण्यात तक्रार नाहीत. म्हाडा इमारत पाडण्याचा विचार करत आहे. पुर्नबांधणीचा सुधारित प्रस्ताव म्हाडा व राज्य शासनाला देण्याकरिता त्रुटी दुरूस्त करण्याकरिता अपीलकाराने माहिती मागीतली आहे. माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने थेट राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२८.०४.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी / अपीलकार हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन दादर (पूर्व) प्लाझ्‍ा सिनेमा समोर न.चि.केळकर मार्ग येथील अब्दूल रहिमान बिल्डींग क्र.३३२-३४० बाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. १) माहितीकरिता अर्ज अधिक्षक, मुंबई शहर नगर भूमापन व भूमी अभिलेख यांच्या नावाने करावा. अर्जाची मागील बाजू मोकळी ठेवावी. २) मिळकत पात्रिका उता-यासाठी / नकाशा सत्यप्रतिलीच्या ख-या नकला मिळण्यासाठी स्वतंत्र अर्ज करावेत. ३) अर्जावर रू.५/- कोर्ट फी स्टॅम्प लावावा. ४) अर्जामध्ये योग्य भूकर पहाणी क्रमांक व महसूल विभाग तसेच नकाशा अथवा मिळकत पात्रिकेच्या किती प्रती पाहिजेत, हे स्पष्टपणे नमुद करावे. ५) अर्ज व फी चे पैसे कार्यालयीन कामकाजाचे दिवशी प्रमुख रोखपाल यांचेकडे भरावेत. ६) नकाशा अथवा मिळकत पत्रिकेच्या उता-याच्या प्रती स्विकारतांना प्रती प्रत ५ रुपये कोर्ट फी स्टॅम्प व नक्कल फी भरलेबाबतची मूळ पावती सादर करावी असे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकारास दि.०९.०९.२००८ च्या पत्रान्वये कळविले होते. सदरबाबीची पुर्तता केल्यानंतर माहिती देण्याची जन माहिती अधिका-याने तयारी दर्शविली आहे. सुनावणीकरिता अपीलकार तसेच जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते. या परिस्थितीत मी असे

आदेश देतो की, अपीलकाराने नमुद बाबीची पुर्तता करावी. त्यानंतर जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती उपलब्ध करुन द्यावी.

**आदेश**

सबब अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक १३.०५.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२४६५/०२**

**ॲड.सोएब खान**
**बी-३०२, शीव अनगाव को.ऑ.हौ.सो.,**
**मालवणी-२, मालाड (प), मुंबई ४०० ९५.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.आयुक्त**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्तर वार्ड,**
**लिबर्टी गार्डन, मामलेदार वाडी,**
**मालाड (प), मुंबई ४०० ०६४.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्तर वार्ड,**
**लिबर्टी गार्डन, मामलेदार वाडी,**
**मालाड (प), मुंबई ४०० ०६४.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार ॲड.सोएब खान यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयेगाकडे दि.२०.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.०५.११.२००७ रोजी अर्ज करुन मालवणी मालाड येथील गेट क्र.१ ते ३ येथील रस्त्यावरील अडथळे दूर करुन जनतेला आणि वाहनास जाण्यायेण्याकरिता रस्ता चांगल्यास्थितीत मोकळा करुन द्यावा म्हणून अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०७.०४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२९.०८.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. रस्त्यावर अतीक्रमण झाल्याची अपीलकाराची तक्रार आहे. तरी जागेची पाहणी करुन आवश्यकती कारवाई करावी. अपीलकारास सुधारित माहिती द्यावी असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.०४.०९.२००८ रोजी आदेश पारित केले. त्यांनतरही जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२८.०४.२००९

रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन मालाड, मालवणी येथील गेट क्र.१ ते ३ येथील रस्त्यावरील अडथळे / अतिक्रमण हटवून वाहने व लोकांना जाण्यायेण्याकरिता रस्ता मोकळा करुन द्यावा म्हणून अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. जन माहिती अधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, मालाड, मालवणी येथील गेट क्र.१ ते ३ येथील रस्त्यावरील आडथळे दूर करुन वाहने व लोकांना जाण्यायेण्याकरिता रस्ता मोकळा करुन देणेबाबत अपीलकाराने मागणी केलेली माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत माहिती द्यावी. अन्यथा जन माहिती अधिका-याविरुध्द केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २० अनुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

**आदेश**

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक १२.०५.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२४६८/०२**

**श्री.दयानंद नाटकर**
**कावराणा बिल्डींग, ऑफीस नं.३,**
**१ ला मजला, २६, पी.डीमेलो रोड,**
**वाडी बंदर, मुंबई ४०० ००९.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक परिवहन,**
**प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (प)**
**१११/डी, आंबिवली व्हिलेजा, मनिस नगर समोर,**
**अंधेरी (प), मुंबई ४०० ०५३.**

**जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन**
**प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (प)**
**१११/डी, आंबिवली व्हिलेजा, मनिस नगर समोर,**
**अंधेरी (प), मुंबई ४०० ०५३.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.दयानंद नाटकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.०३.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.१२.०६.२००७ रोजी अर्ज करुन ट्रक, टेम्पो, टॅक्सी, ऑटोरिक्षा, बसेसच्या मालक / वाहनचालकांना मोटार वाहन कायदा १९८८ कलम २१३ पोटकलम (५) अनुसार प्रश्नाची उत्तरे देणे, निवेदन करण्याकरिता सक्ती करता येत नाही. याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

मोटार वाहन कायद्यातील तरतुदी अमंलात आहेत. अर्जातील बी ते इ येथील मुद्यानुसार मागीतलेली माहिती उक्त अधिनियमांतर्गत मोडत नाही. त्यामुळे अपीलकारास माहिती देता येत नाही असे जन माहिती अधिकारी यांना अपीलकाराने दि.१४.०८.२००७ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांना सदर अपीलावर सुनावणी आयोजित केली. अपीलकाराने मोटार वाहन विभागाच्या कामकाजाची कार्यपध्दती बाबत अनुषंगीक माहिती मागीतली

आहे. सदर माहिती उक्त अधिनियमातंर्गत मोडत नाही. परंतू परिवहन कार्यालयाच्या पारदर्शक कारभाराच्या दृष्टीने अपीलकाराने मागीतलेली माहिती १५ दिवसाचे आत उपलब्ध करुन देण्याबाबत प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना आदेश दिले. त्यांनतरही जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२८.०४.२००९ रोजी सुनावणी ओयाजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन परिवहन विभागाच्या कामकाजाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नसल्याने माहिती नाकारली. परिवहन विभागाच्या कामकाजात पारदर्शकता राहण्याच्या दृष्टीने अपीलकाराने मागीतलेली माहिती पुरविण्यात यावी असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केले. पंरतू जन माहिती अधिका-यांनी सदर आदेशाची अमंलबजावणी केली नाही. जन माहिती अधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दिलेल्या आदेशानुसार अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत पुरविण्यात यावी. अन्यथा उक्त अधिनियमातील कलम २० अनुसार जन माहिती अधिका-याविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

## आदेश

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक १२.०५.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२२४६/०२**

**श्री.शिवाजी जगन्नाथ वाडेकर**
**ओंकार, ३१ अजंली कॉलनी गेडामाळ,**
**शाहूपूरी, सातारा २१५ ००२.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (प्रशासन)**
**आयुक्त दुरधव्यवसाय विकास यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य**
**प्रशासकीय इमारत, अब्दुल गफार खान मार्ग,**
**वरळी, मुंबई ४०० ०१८.**

**जन माहिती अधिकारी,**
**आयुक्त दुरधव्यवसाय विकास यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य**
**प्रशासकीय इमारत, अब्दुल गफार खान मार्ग,**
**वरळी, मुंबई ४०० ०१८.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.शिवाजी वाडेकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.०३.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.१८.०७.२००६ रोजी अर्ज करुन १) शासनाच्या ग्रामीण दुग्धशाळा व वितरण केंद्रे यांची दैनंदिन दुध हताळणीची क्षमता स्वतंत्रपणे किती आहे. २) दुधाच्या दैनंदिन संकलनाची आकडेवारी, प्रत्येक दुग्धशाळेची संकलनाची माहिती, प्रत्येक शितकरण केंद्रावर संकलन होत असलेल्या दुधाची माहिती तसेच ३) कर्मचारी वर्गाची नावानिधी माहिती मागीतली होती.

अर्जातील मुध्दा क्र.१ व २ बाबतची माहिती जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास उपलब्ध करुन दिली. अपूर्ण माहिती मिळाली असल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१७.०८.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१२.१२.२००६ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. अपीलकारास आवश्यकती माहिती दि.३१.१२.२००६ पर्यंत द्यावी असे जन माहिती अधिका-यांना सूचना देउन दि.१६.१२.२००६ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती

आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर जिल्हाधिकारी, पुणे यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुममध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी हजर होते. अपीलकार हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन शासनाच्या ग्रामिण दुग्धशाळा व वितरण केंद्राची दैनंदिन दुध हाताळण्याची क्षमता व इतर अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास अर्जातील मुध्दा क्रमांक १ व २ बाबत माहिती दि.१४.०९.२००६ रोजी दिली. मुध्दा क्र.३ ची माहिती संबंधीत विभागाकडून प्राप्त करुन घ्यावी व अपीलकारास द्यावी असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी जन माहिती अधिका-यांना आदेश दिले. सदर माहिती अपीलकारास प्राप्त झाली नसल्याने त्यांना राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपीलकाराच्या अर्जातील मुध्दा क्र.३ बाबत सर्व संबंधीत विभागाकडून जन माहिती अधिका-यांनी माहिती मागवून प्राप्त करुन अपीलकारास द्यावयाची होती. यासाठी बराच कालावधी उलटून गेला आहे. तेव्हा जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

**आदेश**

सबब अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक १२.०५.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२२४७/०२**

**श्री.महमंद बाबालाल मुल्ला**
**३८, लक्ष्मीनगर, एम.आय.डी.सी.,**
**सातारा.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (मावक-५)**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.महंमद बाबालाल मुल्ला यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.०५.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.२६.०२.२००७ रोजी अर्ज करुन, दि.०१ जानेवारी, २००१ च्या शासन निर्णयाने भालदार ही जात इतर मागासवर्गात समाविष्ट करण्यात आली आहे. त्या संदार्भात राज्य मागासवर्ग आयोगाच्या अहवालाची साक्षांकित प्रत, अहवालावरील सर्व टिप्पण्या, शेरे याची साक्षांकित प्रत व शा.नि.क्र.सी.बी.सी १४/२००२/प्र.क्र.१९९/मावक-५ दि.०४.१०.२००१ ची प्रत मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी, अपीलकारास माहितीपोटी स्पीड पोस्ट टपाल खर्चासह एकूण रू.८४/- इतके शुल्क भरण्याबाबत अपीलकारास दि.०४.०४.२००७ च्या पत्रान्वये कळविले. अपीलकाराने दि.२६.०२.२००७ च्या अर्जान्वये माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी ३० दिवसात माहिती देणे आवश्यक होते. असे असतांना विहित कालावधीत उलटून गेल्यानंतर माहिती पोटी रू.८४/- शुल्क भरण्याबाबत जन माहिती अधिका-याने कळविले. उलट उक्त अधिनियमातील कलम ७ (६) अनुसार माहिती मोफत देणे आवश्यक आहे. म्हणून अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे

दि.२८.०३.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०५.०५.२००९ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांच्या Video Conferncing रुममध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली.

सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन भालदार ही जात इतर मागासवर्गात दि.०१ जानेवारी, २००१ च्या निर्णयान्वये समाविष्ठ करण्यात आली. याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-याने विहित कालावधीत माहिती दिली नाही तर आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल करण्याच्या अपीलकारास उक्त अधिनियमात एक संधी आहे. सदर प्रकरणी अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२८.०३.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. परंतू प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसाचे आत प्रथम अपीलावर सुनावणी आयोजित करावी. आवश्यकते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करण्याचा अपीलकाराचा हक्क अबाधीत राहील.

**आदेश**

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १२.०५.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२३२३/०२**

**श्री.रविकांत सु. दुखंडे**
**३४/२५३, एमएचबी कॉलनी,**
**मजासवाडी (EWS) सर्वोदय नगर,**
**जोगेश्वरी (पू), मुंबई ४०० ०६०.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप मुख्य अधिकारी**
**उप मुख्य अभियंता, मुंबई मंडळ, म्हाडा,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
**उप मुख्य अभियंता, मुंबई मंडळ, म्हाडा,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.रविकांत स.दुखंडे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.०३.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.२६.११.२००८ रोजी अर्ज करुन, सर्वोदय नगर मजासवाडी (EWS) येथे मैदानाच्या जागेवर पक्के मंडप बांधकाम करण्यात आले आहे. त्याची चावी अनधीकृत संस्थेच्या लोकांच्या ताब्यात असून इतर स्थानिक लोकांना त्याचा वापर करण्यास मिळत नाही. याबाबत दि.२१.०८.२००८ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवर केलेल्या कारवाईची अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांने विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१४.०१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.११.०२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता कार्यकारी अभियंता तथा जन माहिती अधिकारी, अपीलकार हजर होते. अपीलकाराने दि.२१.०८.२००८ रोजी मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ यांना तक्रार अर्ज सादर केला होता. त्यावर संबंधीत कार्यालयाशी संपर्क साधावा. पत्रव्यवहार करुन माहिती मिळवावी. तसेच कार्यालयातील नस्तीची तपासणी करुन अपीलकारास २० दिवसात माहिती द्यावी. असे प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दि.१२.०२.२००९ रोजी आदेश पारित केले.

यानंतरही जन माहिती अधिका-याने माहिती दिली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२०.०४.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन सर्वोदय नगर (EWS) येथे मैदानाच्या जागेवर बांधण्यात आलेल्या मंडप बांधकामाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. मंडप बांधकाम म्हाडाच्या जागेवर असल्याने सदर बांधकामास म्हाडाचे सहाय्यक भूव्यवस्थापक (अंधेरी), मुंबई मंडळ यांचेकडून "नाहरकत प्रमाणपत्र" देण्याची बाब होती. म्हणून कार्यकारी अभियंता यांनी दि.२४.०३.२००९ च्या पत्रान्वये सहाय्यक भूव्यवस्थापक (अंधेरी) यांना अपीलकारास परस्पर माहिती देणेबाबत कळविले. त्याची प्रत अपीलकारास दिली. परंतू सहाय्यक भूव्यवस्थापक यांनी अपीलकारास माहिती दिली नाही.

सभा मंडपाचे बांधकाम श्री.रविंद्र वायकर, नगर सेवक यांच्या निधीतून महानगरपालिके तर्फे करण्यात आले आहे. सदर सभा मंडप सर्वोदय संस्थेच्या ताब्यात आहे. सदर संस्था नोंदणीकृत आहे. अपीलकाराने संस्थेबाबत मागीतलेली माहिती दि.१८.०४.२००९ रोजी संस्थेस पत्र पाठवून मागीतली सदर पत्राची प्रत अपीलकारास पाठविली. सभा मंडप बांधकामास म्हाडा कडून "ना हरकत प्रमाणपत्र" घेतले असल्यास छायाप्रत उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच मंडपाचा ताबा सर्वोदय समितीस दिला असल्यास अटी व शर्तीच्या कागदपत्राची अपीलकारास परस्पर द्यावी असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२१.०४.२००९ च्या पत्रान्वये कळविले. त्याची प्रत अपीलकारास वरिष्ठ पोलीस निरीक्षक मेघवाडी पोलीस स्टेशन, जोगेश्वरी यांना दि.२९.०४.२००९ रोजी पत्र पाठवून जन माहिती अधिका-यांनी विनंती केली. यावरुन अपीलकाराने मागणी केलेली माहिती थेट अधिका-यांशी संबंधीत नव्हती. जन माहिती अधिका-यांना दि.२१.०४.२००९ रोजी दिलेल्या Show Cause नोटीस नुसार त्यांनी दि.०८.०५.२००९ रोजी लेखी अहवाल सादर करुन वरीलप्रमाणे सविस्तर खुलासा सादर केला आहे. यावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकाराचा अर्ज केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५

मधील कलम ६ (३) (दोन) येथील परंतूकानुसार संबंधीत जन माहिती अधिका-याकडे ५ दिवसाचे आत हस्तांतरीत करुन अपीलकारास विहित कालावधीत माहिती देणेबाबत कळविण्याची कार्यवाही जन माहिती अधिका-यांनी केलेली नाही. भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर आवश्यकती कार्यवाही विहित कालावधीत करण्याची दक्षता घ्यावी अशी जन माहिती अधिकारी यांना समज देण्यात येत आहे.

## आदेश

सबब अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १२.०५.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२२३८/०२**

**श्री.किरण किशोर पैठणकर**
**सुहास काळे, १७९०/१४ मेंढे गल्ली पंढरपूर,**
**विठठल मंदिराजवळ पंढरपूर जि.सोलापूर.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.मर्या,**
**महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,**
**भविष्य निर्वाह निधी कक्ष, धारावी रोड,**
**मांटुगा, मुंबई ४०० ०१९.**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्य लेखा अधिकारी**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.मर्या,**
**महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,**
**भविष्य निर्वाह निधी कक्ष, धारावी रोड,**
**मांटुगा, मुंबई ४०० ०१९.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.किरण किशोर पैठणकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०१.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.०९.१०.२००७ रोजी अर्ज करुन, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कर्मचारी निवृत्तीवेतन योजनेतंर्गत मिळणा-या लाभाविषयी अनुषंगीक एकूण ७ मुद्यावर माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि.१७.०१.२००८ च्या पत्रान्वये माहिती नाकारली. यामुळे अपीलकाराने दि.२५.११.२००७ रोजी प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर जिल्हाधिकारी, पुणे यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये दि.०५.०५.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.

सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कर्मचारी निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत मिळणा-या लाभाविषयी अनुषंगीक एकूण ७ मुद्यावर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही तर आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल करण्याची उक्त अधिनियमात अपीलकारास एक संधी उपलब्ध आहे. सदर प्रकरणी अपीलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. अपीलकारास माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही.

या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सदर प्रकरणी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसाचे आत सुनावणी आयोजित करावी. सुनावणी घेउन आवश्यकते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही. तर राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करण्याचा अपीलकाराचा हक्क अबाधीत राहील.

## <u>आदेश</u>

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** | **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १४.०५.२००९** | **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२००३/०२**

**श्री.शेखर काशिनाथ एल कापुरे**
**५९/आंबेडकर सदन करी रोड,**
**मुंबई ४०० ०१३. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एल, विभाग, कुर्ला (प), मुंबई ४०० ०७०.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता**
**(इमारती व कारखाने)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एल, विभाग, कुर्ला (प), मुंबई ४०० ०७०. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.शेखर काशिनाथ एल. कापुरे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.१५.०५.२००८ रोजी अर्ज करुन, मे.साईबाबा गारमेंट २००६ मोहेल व्हिलेज, अंधेरी घाटकोपर लिंक रोड, असल्फा व्हिलेज जवळ म्युनस्पिल शाळेच्या समोर, साकीनाका, मुंबई ७२. सदर जागेत अस्तित्वात असलेल्या गारमेंट कंपनीच्या फॅक्टरी परमिट संबंधी अनुषंगीक माहिती मागीतली होती.

सदर कंपनीला मुंबई महानगरपालिका अधिनियमातील कलम ३९० अन्वये परवाना देण्यात आला नाही. अथवा परवान्याकरिता कार्यालयात अर्ज प्राप्त झालेला नाही. अथवा परवान्याकरिता कार्यालयात अर्ज प्राप्त झालेला नाही. अथवा परवान्याकरिता कार्यालयात अर्ज प्राप्त झालेला नाही. कंपनीच्या व्यवस्थापनाने माळा, पेटमाळा, बांधकामाचे नुतरीकरण, नवीन बांधकाम व वाढीव बांधकामासाठी परवानगी करिता केलेला अर्ज कार्यालयात उपलब्ध नाही. कंपनी विरोधात दंडात्मक कारवाई केलेली नाही.

न्यायालयात दावा प्रलंबित नाही.  असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) एल विभाग यांनी अपीलकारास दि.११.०६.२००८ च्या पत्रान्वये कळविले.  माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.११.०७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२५.०८.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली.  मेसर्स साई इंटरप्राइजेस कंपनीस म.न.पा.अधिनियमातील कलम ३९० अनुसार परवाना दिला असल्याचे अपीलकाराने प्रतिपादन केले की, म.न.पा. अधिनियमातील कलम ३९० प्रमाणे कंपनीस परवाना मंजूर केलेला नाही असे प्रथम अपीलाच्या सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले.  शाखा अभियंता श्री.बोकडे हे श्री.पी.के.कांबळे, सहाय्यक अभियंता (कारखाने) एल विभाग यांच्या वतीने सुनावणीकरिता हजर होते.  कार्यालयातील संबंधीत फाईल/ कागदपत्र तपासावीत.  त्यांनतर अपीलकारास उचित माहिती द्यावी असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.३०.०८.२००८ रोजी आदेश पारित केले.  पूर्ण माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.  सदर अपीलावर दि.२९.०४.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.  सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन मेसर्स साईइंटरप्राइजेस कंपनीस दिलेल्या परवान्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.  सदर कंपनीस परवाना दिला नसल्याचे जन माहिती अधिका-याचे म्हणने आहे.  कार्यालयातील संबंधीत कागदपत्राची पुन्हा तपासणी करुन अपीलकारास आवश्यकती माहिती द्यावी असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केले.  पूर्ण माहिती मिळाली नसल्याचा अपीलकाराने व्दितीय अपीलात मुध्दा उपस्थित केला आहे व पूर्ण माहिती द्यावी अशी मागणी केली आहे.  या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी प्रथम सदर कंपनी संबंधीची फाईल / कागदपत्र अपीलकारास

निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावीत. त्यांनतर मागणीप्रमाणे अपीलकारास फाईल / कागदपत्रावरील उपलब्ध माहिती अपीलकारास पुरविण्यात यावी.

**<u>आदेश</u>**

सबब अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक १४.०५.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२३९९/०२**

**श्री.विशाल रामदास भोगे**
**रुम नं.३०६, बि.नं.१०१, न्यू म्हाडा कॉलनी,**
**डॉ. आंबेडकर नगर, मानखुर्द, मुंबई ४०० ०४३.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य अभियंता**
**मुंबई मंडळ, महराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण,**
**कलानगर, वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
**मुंबई मंडळ, महराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण,**
**कलानगर, वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.विशाल भोगे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.०३.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.१७.११.२००८ रोजी अर्ज करुन, आवक नोंदवहीतील उत्ता-याच्या प्रतीची मागणी केली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि.०२.१२.२००८ रोजी अपीलकारास दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.२३.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलकारास दि.०२.१२.२००८ च्या पत्रान्वये आवक नोंदवहीच्या उता-याच्या प्रती दिल्या. संबंधीत नस्तीचा शोध घेण्यात यावा. नस्तीची तपासणी करुन उपलब्ध माहिती अपीलकारास १५ दिवसाचे आत द्यावी असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२६.१२.२००८ रोजी आदेश पारित केले. त्यांनतरही माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२३.०४.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन आवक नोंदवहीच्या उत्ता-याच्या प्रती व अनुषंगीक माहिती मागीतली होती. आवक नोंदवहया मागील ३ वर्षाच्या कालावधीपर्यतच्याच संग्रहीत ठेवण्यात येतात. मंत्री महोदयाचे पत्र कार्यालयास उध्देशून लिहिलेले नाही. अपीलकाराची फोटोपास देण्याची / तोडलेल्या दुकानाची पुर्नबांधणी करुन मिळणेबाबतची विनंती मान्य होउ शकत नाही असा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबतचा अहवाल उप लोक आयुक्त यांना सादर करण्यात आला. उप लोक आयुक्त यांच्या आदेशानुसार सद्यस्थितीत श्री.बळाराम भोगे यांची मुख्य अधिकारी / मुख्यमंत्री यांचेकडे सुनावणीची कार्यवाही सुरु आहे असे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकारास दि.०२.१२.२००८ च्या पत्रान्वये कळविले होते. संबंधीत नस्तीची तपासणी करुन अपीलकारास उपलब्ध माहिती द्यावी असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी जन माहिती अधिका-याला आदेश दिले होते. अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती मिळाली नसल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास संबंधीत फाईल, कागदपत्र, नोंदवहया निरीक्षणाकरिता प्रथम उपलब्ध करुन द्याव्यात. अपीलकाराने कार्यालयात उपस्थित राहून संबंधीत कागदपत्राची पाहणी करावी. त्यानंतर मागणीप्रमाणे अपीलकारास उपलब्ध कागदपत्राच्या छायाप्रती जन माहिती अधिका-यांनी पुरवाव्यात.

## आदेश

सबब अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १४.०५.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्र.२००९/२४६४/०२

**श्री.व्ही.व्ही.पई / एसके भाल्ला**
**बिल्डींग नं.२५, फ्लॅट नं.२०२/३०४,**
**वरुन को.ऑ.हौ.सो, ओशिवारा म्हाडा,**
**अंधेरी (प), मुंबई ४०० ०५३.** .... अपीलकार

<u>विरूध्द</u>

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य अधिकारी**
**उपमुख्य अधिकारी, म्हाडा, मुंबई मंडळ, गृहनिर्माण भवन,**
**वाद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक-२**
**उपमुख्य अधिकारी, म्हाडा, मुंबई मंडळ, गृहनिर्माण भवन,**
**वाद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.** .... उत्तरवादी

<u>विवेचन</u>

अपीलकार श्री.विशाल भोगे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयेगाकडे दि.३१.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.१७.०४.२००७ रोजी अर्ज करुन, म्हाडाकडे खोटे शपथपत्र सादर करुन सदनिका नियमित करुन घेतल्याप्रकरणी श्री.दलबीर सींह यांचे विरुध्द दाखल केलेल्या तक्रारीवर केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती.

श्री.दलबीर सिंह यांचे नावे एक खिडकी योजगेतंर्गत गाळा नियमित करण्यात त्यांच्या पत्नीचा किंवा अज्ञान मुलाच्या प्रतिज्ञापत्र आवश्यक नसल्याने श्री.दलबीर सिंह यांनी प्रतिज्ञापत्र सादर केले नाही. प्रतिज्ञापत्र सादर न केल्यामुळे खोटी माहिती देण्याचा प्रभाव उद्‌भवत नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२०.०६.२००७ च्या पत्रान्वये कळविले.  यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०८.०१.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले.  प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.३०.०१.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली.

श्री.दलबीर सिंअ यांच्यानावावर यशोदिप सहकारी गृहनिर्माण संस्था ओशिवरा येथे सदनिका क्र.८०२ आहे.  तरी श्री.दलबीर सिंह यांनी खोटे प्रतिज्ञापत्र म्हाडास देउन वरुण सहकारी गृहनिर्माण

संस्थेमध्ये सदनिका क्र.४०१ घेतली असल्याची अपीलकारांची तक्रर आहे. माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक (२) यांनी प्रकरणाची चौकशी करुन योग्यती कायदेशिर कारवाई करावी व अपीलकारास संबंधीत नस्ती निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिले. प्रथम अपीलाच्या सुनावणीनंतर श्री.दलबीर सिंह यांची फाईल निरीक्षणाकरिता अपीलकारास उपलब्ध करुन देण्यात आली. तसेच सदर प्रकरणी चौकशी करुन योग्यती कारवाई करावी असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश दिले होते. परंतू आवश्यक कारवाई केली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२८.०४.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन श्री.दलबीर सिंह यांनी म्हाडास खोटे प्रमाणपत्र देउन वरुन सहकारी गृहनिर्माण संस्थेतील सदनिका क्र.४०१ घेतली आहे. श्री.दलबीर सींह यांच्या विरुध्द निष्कासनाची कारवाई करण्याची अपीलकाराची मागणी आहे. गाळा क्र.२५/४०१ हा श्री.दलबीर सिंह यांचे नावे एक खिडकी योजनेअंतर्गत अर्जदाराकडून अर्जदाराचा किंवा त्यांच्या पत्नीचा किंवा अज्ञान मुलाच्या नावे महानगरपालिका क्षेत्रात मालकीचा निवासी गाळा नसल्याचे प्रतिज्ञापत्र आवश्यक नसल्याने अर्जदाराने अर्जदाराने सदर प्रतिज्ञापत्र सादर केले नाही. प्रतिज्ञापत्र सादर न केल्यामुळे खोटी माहिती देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही असे जन माहिती अधिका-यांनी दि.०५.०७.२००६ च्या पत्रान्वये ओशिवरा वरुन सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सचिवांना कळविले आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी नियमानुसार अपीलकारास समर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

सबब अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**

**दिनांक १४.०५.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२४६४/०२**

**श्री.व्ही.व्ही.पई / एसके भाल्ला**
**बिल्डींग नं.२५, फ्लॅट नं.२०२/३०४,**
**वरून को.ऑ.हौ.सो, ओशिवारा म्हाडा,**
**अंधेरी (प), मुंबई ४०० ०५३.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य अधिकारी**
**उपमुख्य अधिकारी, म्हाडा, मुंबई मंडळ, गृहनिर्माण भवन,**
**वाद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक-२**
**उपमुख्य अधिकारी, म्हाडा, मुंबई मंडळ, गृहनिर्माण भवन,**
**वाद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.विशाल भोगे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयेगाकडे दि.३१.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.१७.०४.२००७ रोजी अर्ज करुन, म्हाडाकडे खोटे शपथपत्र सादर करुन सदनिका नियमित करुन घेतल्याप्रकरणी श्री.दलबीर सींह यांचे विरुध्द दाखल केलेल्या तक्रारीवर केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती.

श्री.दलबीर सिंह यांचे नावे एक खिडकी योजगेतंर्गत गाळा नियमित करण्यात त्यांच्या पत्नीचा किंवा अज्ञान मुलाच्या प्रतिज्ञापत्र आवश्यक नसल्याने श्री.दलबीर सिंह यांनी प्रतिज्ञापत्र सादर केले नाही. प्रतिज्ञापत्र सादर न केल्यामुळे खोटी माहिती देण्याचा प्रभाव उद्‌भवत नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२०.०६.२००७ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०८.०१.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.३०.०१.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली.

श्री.दलबीर सिंह यांच्यानावावर यशोदिप सहकारी गृहनिर्माण संस्था ओशिवरा येथे सदनिका क्र.८०२ आहे. तरी श्री.दलबीर सिंह यांनी खोटे प्रतिज्ञापत्र म्हाडास देउन वरुण सहकारी गृहनिर्माण

संस्थेमध्ये सदनिका क्र.४०१ घेतली असल्याची अपीलकारांची तक्रर आहे. माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक (२) यांनी प्रकरणाची चौकशी करुन योग्यती कायदेशिर कारवाई करावी व अपीलकारास संबंधीत नस्ती निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिले. प्रथम अपीलाच्या सुनावणीनंतर श्री.दलबीर सिंह यांची फाईल निरीक्षणाकरिता अपीलकारास उपलब्ध करुन देण्यात आली. तसेच सदर प्रकरणी चौकशी करुन योग्यती कारवाई करावी असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश दिले होते. परंतू आवश्यक कारवाई केली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२८.०४.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन श्री.दलबीर सिंह यांनी म्हाडास खोटे प्रमाणपत्र देउन वरुन सहकारी गृहनिर्माण संस्थेतील सदनिका क्र.४०१ घेतली आहे. श्री.दलबीर सींह यांच्या विरुध्द निष्कासनाची कारवाई करण्याची अपीलकाराची मागणी आहे. गाळा क्र.२५/४०१ हा श्री.दलबीर सिंह यांचे नावे एक खिडकी योजनेअंतर्गत अर्जदाराकडून अर्जदाराचा किंवा त्यांच्या पत्नीचा किंवा अज्ञान मुलाच्या नावे महानगरपालिका क्षेत्रात मालकीचा निवासी गाळा नसल्याचे प्रतिज्ञापत्र आवश्यक नसल्याने अर्जदाराने अर्जदाराने सदर प्रतिज्ञापत्र सादर केले नाही. प्रतिज्ञापत्र सादर न केल्यामुळे खोटी माहिती देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही असे जन माहिती अधिका-यांनी दि.०५.०७.२००६ च्या पत्रान्वये ओशिवरा वरुन सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सचिवांना कळविले आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी नियमानुसार अपीलकारास समर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

सबब अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १४.०५.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२२५१/०२**

**डॉ. दिलीप मल्हारराव पाटील**
**४०८, मंगळवार पेठ, सातारा,**
**ता.जि.सातारा ४१५ ००२.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव**
**राज्यपालांचे सचिव कार्यालय,**
**राजभवन, मलबार हिल, मुंबई ४०० ०३५.**

**जन माहिती अधिकारी,**
**राज्यपालांचे सचिव कार्यालय,**
**राजभवन, मलबार हिल, मुंबई ४०० ०३५.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार डॉ.दिलीप मल्हारराव पाटील यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.०४.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.०९.११.२००७ रोजी अर्ज करुन, अपीलकारास सेवा समाप्तीची शिक्षा देण्यात आली. याबाबत अनुषंगीक ७ मुद्यांवर माहिती मागीतली होती.

केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६(३) अनुसार अपीलकाराचा माहितीच्या अधिकारातील दि.०९.११.२००७ चा अर्ज सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेशी संबंधीत असल्याने पुढील आवश्यक कार्यवाहीकरिता त्यांचेकडे हस्तांतरीत केला. सदर बाब अपीलकारास दिनांक २३.११.२००७ च्या पत्रान्वये अवगत करण्यात आली. यामुळे समाधान झाले नसल्याचे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२७.१२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलकाराचा अर्ज जन माहिती अधिकारी यांनी सचिव, सार्वजनिक आरोग्य विभागाकडे नियमानुसार हस्तांतरीत केला आहे. आवश्यकती माहिती अपीलकाराने सार्वजनिक आरोग्य विभागाकडून प्राप्त करुन घ्यावी लागेल. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराने समर्थन करुन दि.२८.०१.२००८

रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०५.०५.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन त्यांना सेवेतून बडतर्फ करण्याची शिक्षा देण्यात आली याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकार हे सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गतचे कर्मचारी असल्याने कारणे दाखवा नोटीसीची प्रत, दोषारोपत्र, विभागीय चौकशी संबंधीची पत्र इत्यादी अनुषंगीक माहिती सार्वजनिक आरोग्य विभागाकडून प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. यावरुन अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी नियमानुसार अपीलकारास समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १४.०५.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२३९८/०२**

**श्री.एम.जी.जॉर्जसन**
**फ्लॅट नं.बी-९, प्रयोग प्रभात कॉलोनी,**
**सातांक्रुझ (पू), मुंबई ४०० ०५५.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**धर्मादाय आयुक्त, ३ रा मजला,**
**८३, डॉ.ॲनी बेझंट, वरळी, मुंबई ४०० ०१८.**

**जन माहिती अधिकारी,**
**धर्मादाय आयुक्त, ३ रा मजला,**
**८३, डॉ.ॲनी बेझंट, वरळी, मुंबई ४०० ०१८.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.एम.जी.जॉर्जसन यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयेगाकडे दि.०६.०३.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.२४.११.२००८ रोजी अर्ज करुन, सांताक्रुझ (प), मुंबई येथील ट्रस्ट नोंदणी क्र.एफ-१०७५६ मध्ये क्रुप्रशासन, अफरातफर, कपट कारस्थान व अनियमितता असल्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.१४.०१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलकाराने मागीतलेली माहिती धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचेशी संबंधीत नसून सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय यांचेशी संबंधीत आहे. म्हणून अपीलकाराचा अर्ज / अपील अर्ज पुढील आवश्यक कार्यवाहीकरिता त्या कार्यालयाकडे पाठवून अपीलकारास तसे दि.१६.०२.२००९ च्या पत्रान्वये कळविले. अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती प्राप्त झाली नसल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२२.०४.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलकार हजर होते. जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते.

सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणने ऐकून घेण्यात आले.  तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन ट्रस्ट नोंदणी क्र.एफ-१०७५६ बाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.  अपीलकाराने मागणी केलेली माहिती धर्मादाय आयुक्त कार्यालयाशी संबंधीत नव्हती.  म्हणून अपीलकाराचा अर्ज / अपील अर्ज सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयातील जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे दि.१६.०२.२००९ रोजी हस्तांतरित करण्यात आला.  सदर अर्जानुसार मागणी केलेली माहिती अपीलकारास सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयातील जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी देणे आवश्यक आहे.  सदर प्रकरणी दोन्ही अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिलेली नाही.  सदर दोन्ही अधिका-याची कृती निश्चित योग नाही.  या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी.  अन्यथा उक्त अधिनियमातील कलम २० अनुसार जन माहिती अधिका-याविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

## आदेश

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक १४.०५.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२२४५/०२**

**श्री.कृष्णा विश्वनाथ जंगम**
**मु.पो.ता.वाळवा, जि.सांगली. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**लोक उप आयुक्त व लोक आयुक्त, महाराष्ट्र यांचे कार्यालय,**
**१ ला मजला, नवीन प्रशासकीय भवन,**
**मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**लोक उप आयुक्त व लोक आयुक्त, महाराष्ट्र यांचे कार्यालय,**
**१ ला मजला, नवीन प्रशासकीय भवन,**
**मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.कृष्णा विश्वनाथ जंगम यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.०४.२००६ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.२४.०१.२००६ रोजी अर्ज करुन, उक्त अधिनियमातील कोणत्या कलमानुसार जन माहिती अधिकारी यांना दंड करता येतो त्या कलमाचे छायाप्रत, जन माहिती अधिकारी यांना प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दंड केला असल्यास तो दंड कोणत्या कलमान्वये रद्द करता येतो त्याची छायाप्रत उपलब्ध करुन देण्याची मागणी केली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०२.०२.२००६ च्या पत्रान्वये सविस्तर माहिती दिली. अपीलकारास दिलेली माहिती कॉमन स्वरुपाची आहे. या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१४.०२.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२८.०२.२००६ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. जन माहिती अधिका-याने दिलेल्या उत्तरावरुन अपीलकाराचे समाधान होत नसल्यास त्यांनी त्याबाबत तज्ञाकडून अर्थ लावून घेणे आवश्यक होते. कायद्याचे अज्ञान क्षम्य नाही. अपीलकाराच्या अपीलात कोणतेच तथ्य व गुणवत्ता आढळून येत नाही. म्हणून प्रथम अपील खारीज करण्यात आले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती

आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०५.०५.२००९ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांच्या व्हीडीओ कॉन्फन्सींग रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी व अपीलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन जन माहिती अधिका-यांना विलंबाबाबत दंड आकारणी करण्याची अधिनियमातील तरतुद, जन माहिती अधिका-यांना आकारलेला दंड रद्द करण्याची अधिनियमातील तरतुदीविषयी माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.०२.०२.२००६ च्या पत्रान्वये सविस्तर माहिती दिली असल्याचे दिसून येते. यावरुन अर्जावर जन माहिती अधिका-यांनी नियमानुसार समर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही.

**आदेश**

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १४.०५.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२२४९/०२**

**श्री.मधुकर मारूतीराव पंडीत**
**कृष्णा अपार्टमेंट, फ्लॅट नं.२,**
**डी.एड्.कॉलेजजवळ, लक्ष्मीनगर,**
**फलटण ४१५ ५२३, जि.सातारा.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.मधुकर पंडीत यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०५.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.३०.०७.२००७ रोजी अर्ज करुन, उक्त अधिनियमातील कलम ४ अनुसार १२० दिवसाच्या आत स्वंयप्रेरणेने प्रसिध्द करावयाची महाराष्ट्र राज्य लॉटरी संबंधीची सविस्तर माहिती मागीतली होती.

अपीलकाराने दिनांक ३०.०७.२००७ च्या अर्जात उपस्थित केलेल्या मुद्यानुसार मागणी केलेली माहिती ही सन २००१ ते २००७ या कालावधीतील असून ती पूर्वीच्या कार्यालयाशी संबंधीत आहे. सदर प्रकरणाची माहिती त्यांचेकडून संकलीत करण्यास बराच कालावधी लागण्याची शक्यता आहे. ४ ते ५ महिन्याचा कालावधी लागणार आहे. माहिती तयार होताच तसे अपीलकारास अवगत करण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांना दि.२३.०८.२००७ च्या पत्रान्वये कळविले. माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरून अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे दि.२८.०८.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२०.१०.२००७ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. अपीलकाराने मागणी केलेल्या कागदपत्राच्या एकूण २४९० प्रती आहेत. माहिती पोटी रू.४९८०/- इतके शुल्क भरुन माहिती प्राप्त करून घ्यावी असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास दि.१२.१२.२००७ च्या

पत्रान्वये कळविले. महाराष्ट्र राज्य लॉटरी संदर्भातील मागणी केलेली माहिती पत्रव्यवहाराने मुदतवाढ मागून घेउन वेळकाढूपणा चालू ठेवून माहिती देण्याची टाळले जात असल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर दि.०५.०५.२००९ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांच्या Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात यावी. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, अपीलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन महाराष्ट्र राज्य लॉटरी संदर्भात अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी यांनी अपीलकारास माहिती पोटी रु.१७८०/- एवढे शुल्क आकारुन एकूण ८९३ पृष्ठे दि.३१.१२.२००८ च्या पत्रासोबत उपलब्ध करुन दिली. यावरुन सदर प्रकरणी अपीलकारास माहिती प्राप्त झाली असल्याचे दिसून येते. जन माहिती अधिका-यांनी सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक १४.०५.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२२३१/०२**

**श्री.हरिभाउ रघुनाथ काकडे**
**१५/बी-१, सर्नत्र सहकारी गृहरचना म,**
**पौड रस्ता, कोथरूड, पुणे ४११ ०२९.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा संचालक,**
**तंत्रशिक्षण संचालनालय, महराष्ट्र राज्य,**
**३, महानगरपालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७,**
**मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**तंत्रशिक्षण संचालनालय, महराष्ट्र राज्य,**
**३, महानगरपालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७,**
**मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.हरिभाउ काकडे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयेगाकडे दि.३०.०४.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.२९.०१.२००८ रोजी अर्ज करुन, अ, ब, क व ड या मुद्यांवर माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२५.०३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर जिल्हाधिकारी, पुणे यांचे कार्यालयातील Video conferencing रुम मध्ये दि.०४.०५.२००९ सुनावणी आयोजित करण्यात आली.

सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन एकूण ४ मुद्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही तर आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल करण्याची उक्त अधिनियमानुसार अपीलकारास एक संधी आहे. सदर प्रकरणी अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले होते. परंतू प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसाचे आत सदर प्रकरणी सुनावणी आयोजित करावी. आवश्यक ते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करण्याचा अपीलकाराचा हक्क आबाधीत राहील.

## आदेश

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १६.०५.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२२२५/०२**

**श्री.सुनिलराव सखाराम वाघमारे**
**न्यू-प्रेस कॉलनी, ६/सी येरवडा, पुणे ४११ ००६. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**उद्योग, उर्जा व कामगार विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**उद्योग, उर्जा व कामगार विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.सुनिलराव वाघमारे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.०१.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.०५.०५.२००७ रोजी अर्ज करुन, सचिव, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांना दि.१०.१२.२००२ रोजी "वरिष्ठ मुद्रीत शोधक" या पदावर पदोन्नती मिळणेबाबत अर्ज सादर केला होता. सदर अर्जावर झालेल्या कार्यवाहीबाबतच्या टिप्पणीची माहिती मागीतली होती.

अपीलकाराच्या अर्जा संदर्भात ज्या नस्तीवर कार्यवाही सुरु करण्यात आली होती ती नस्ती 'ड' वर्ग दप्तरी दाखल करण्यात आली होती. 'ड' वर्ग नस्त्या एक वर्ष पर्यंत जतन करुन ठेवण्यात येतात. सदर नस्तीवर सन २००३ मध्ये कार्यवाही करुन 'ड' वर्ग दप्तरी दाखल केली होती. अभिलेखाच्या निंदणीकरणाच्या वेळी संबंधीत नस्ती ऑक्टोंबर २००५ मध्ये नष्ट करण्यात आली. यामुळे अपीलकाराने मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०८.०६.२००७ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२८.०९.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही, अशी परिस्थिती नाही.

अपीलकाराने मागीतलेली माहिती नस्ती नष्ट केल्यामुळे उपलब्ध नसल्याने ती देता येउ शकली नाही अशी वस्तुस्थिती असल्याचे नमुद करुन अपील दि.२८.०९.२००७ रोजी आदेश पारित करुन निकाली काढले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०४.०५.२००९ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांच्या Video Conferncing रूम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली.

सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपीलकार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन दि.१०.१२.२००२ रोजी सादर केलेल्या अर्जावर झालेल्या कार्यवाहीबाबतच्या टिप्पणीच्या प्रतीची मागणी केली होती. अभिलेखाच्या निंदनीकरणाच्या वेळी संबंधीत नस्ती नष्ट करण्यात आली. यामुळे जन माहिती अधिकारी माहिती देउ शकले नाहीत असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकारास नियमानुसार समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी पारित केलेल्या आदेशामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १८.०५.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२२३२/०२**

**श्री.दत्तात्रय मणेप्पा मुलगे**
**उप विभागीय अभियंता**
**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विकास,**
**उप विभाग क्र.४ (पुणे लवकर पाणी पुरवठा केंद्राचा आवारात)**
**पुणे १.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी,**
**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, ४ था मजला नरिमन पॉंईट,**
**मुंबई ४०० ०२१.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी,**
**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सिडको भवन, (दक्षिण कक्ष)**
**बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.दत्तात्रय मुलगे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.०५.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.१४.०२.२००८ रोजी अर्ज करून, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण च्या पुणे येथील विकास विभागाचे, पुणे येथील लष्कर पाणी पुरवठा केंद्रातील जागेत स्थलांतरण करण्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलकारास दि.२९.१२.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली. अपेक्षित माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२७.०३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०४.०५.२००९ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांचे कार्यालयात Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे यांच्या विकास विभागाचे, पुणे येथील लष्कर पाणी पुरवठा केंद्रातील जागेत स्थलांतरण करण्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-याने अपीलकारास दि.२९.१२.२००७ च्या पत्रासोबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विकास विभाग, पुणे हे कार्यालय पुणे लष्कर पाणी पुरवठा केंद्र येथे स्थलांतरित करण्याबाबत अनुषंगीक माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसून येते. अपेक्षित माहिती मिळाली नसल्याचा मुध्दा अपीलकाराने व्दितीय अपीलात उपस्थित केला आहे. नेमकी कोणती माहिती नाही याबाबत अपीलकाराने खुलासा केलेला नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, संबंधीत फाईल अपीलकारास प्रथम निरीक्षणांकरिता उपलब्ध करुन द्यावी. त्यानंतर मागणीनुसार आवश्यकत्या कागदपत्राच्या छायाप्रती नियमानुसार अपीलकारास उपलब्ध करुन द्याव्यात.

## आदेश

सबब अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक १८.०५.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२५३४/०२**

**श्री.व्ही.एम.कोल्हे**
**४५३, आनंद नगर, तिरंगा चौक,**
**नागपूर ०९.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**आयुक्त दुग्धविकास विभाग यांचे कार्यालय,**
**खान अब्दुल गफार खान मार्ग,**
**वरळी सी फेस, मुंबई ४०० ०१८.**

**जन माहिती अधिकारी,**
**आयुक्त दुग्धविकास विभाग यांचे कार्यालय,**
**खान अब्दुल गफार खान मार्ग,**
**वरळी सी फेस, मुंबई ४०० ०१८.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.व्ही.एम.कोल्हे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयेगाकडे दि.१७.०८.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये दि.१९.०५.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

जन माहिती अधिकारी यांचेकडे दिनांक ०९.०७.२००७ रोजी अपीलकाराने अर्ज करुन, दुग्धशाळा तंत्र व व्यवस्थापन गट या सेवा जेष्ठता सूचित अपीलकाराचे नाव क्र.२२ वर आहे. अपीलकारास सेवाजेष्ठतेनुसार कनिष्ट असलेले कर्मचारी अपीलकारापेक्षा जास्त वेतन घेत आहेत. याबाबत अपीलकाराने अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे, प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दिनांक १८.०९.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. अपीलकाराच्या अर्जातील मुध्दा क्र.२ ते ५ बाबत माहिती मागण्याऐवजी कारणे विचारली आहेत.

विचारलेली करणे माहितीच्या अधिकारात बसत नसल्याने माहिती देणे शक्य होत नाही. मुध्दा क्रमांक १ बाबत कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती दि.१८.०१.२००८ च्या पत्रानुसार अपीलकारास पुरविण्यात आली. यावरुन अपीलकारास विलंबाने माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. जन माहिती अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर वेळीच कार्यवाही करण्याची जन माहिती अधिकारी यांनी दक्षता घ्यावी अशी त्यांना समज देण्यात येत आहे. या परिस्थितीत सदर प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २६.०५.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२५४३/०२**

**श्री.अनिल बाबुलाल कांबळे**
**उपसंचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य,**
**उद्योग भवन, ६ वा मजला, सिव्हील लाईन्स,**
**नागपूर ४४० ००१.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**उद्योग, उर्जा व कामगार विभाग,**
**(कामगार), मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**उद्योग, उर्जा व कामगार विभाग,**
**(कामगार), मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.अनिल कांबळे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.०७.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दिनांक १९.०५.२००९ रोजी जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलार्थी हजर होते.

अपीलार्थीने जन माहिती अधिकारी यांचेकडे दिनांक ०६.०५.२००८ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागीतली होती.

"औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयातील मागासवर्गीय अधिका-यांना सहसंचालक व उप संचालक पदावरील पदोन्नतीबाबत ५०/१०० बिंदू नामावलीच्या (रोस्टर) मागासवर्गीय कक्षाने (बी.सी.सेल) पडताळणी करुन मंजूर केलेल्या सन १९९५ ते ३१ मार्च, २००८ या कालावधीच्या प्रतीची मागणी केली होती."

जन माहिती अधिका-यांनी अपीलार्थीना विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. सदर दोन्ही अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत सदर प्रकरणी मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी. अन्यथा उक्त अधिनियमातील कलम २० अन्वये जन माहिती अधिका-याविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

**आदेश**

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २६.०५.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२५३९/०२**

**श्री.पँथर प्रकाश बनसोड**
**सचिव,**
**सिव्हील-हयुमन राईटस प्रोटेक्शन असो.**
**१८०, उंटखाना, मेडीकल कॉलेज रोड,**
**नागपूर ४४० ००९.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस महासंचालक,**
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग,**
**कुलाबा, मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा पोलीस अधिक्षक**
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग,**
**कुलाबा, मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.पँथर प्रकाश बनसोड यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयेगाकडे दि.२८.०३.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दिनांक १९.०५.२००९ रोजी जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या कार्यालयातील Video Conferncing रूम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दिनांक २४.११.२००६ रोजी अर्ज करुन, १) अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा १९८९ च्या अनुषंगाने कायदा आमलात आल्यापासून किती गुन्हे नोंदविण्यात आले त्याची जिल्हानिहाय माहिती २) न्यायालयात प्रलंबित असलेली व निकाली काढलेल्या ३) किती प्रकरणात शिक्षा ठोठावली, किती प्रकरणात शिक्षा झाली नाही ४) उक्त कायद्यातंर्गत मा.उच्च न्यायालयात निकाली काढलेली व प्रलंबित असलेली अपील प्रकरणाची जिल्हानिहाय माहिती मागीतली होती. माहितीपोटी रु.४४/- इतके शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घेणेबाबत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकारास दिनांक २२.१२.२००६ च्या पत्रान्वये कळविले. दि.०९.०२.२००७ रोजी

अपीलकाराने रु.४४/- इतक्या रक्कमेची मनिऑर्डर पाठविली. दि.०६.०३.२००७ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती पुरविण्यात आली. जन माहिती अधिकारी यांनी अपीलकारास पाठविलेल्या माहितीचे समर्थन करुन तसे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास दि.२६.०३.२००७ च्या पत्रान्वये उत्तर पाठविले. यावरुन अपीलकाराने मागणी केलेली माहिती अपीलकारास पुरविण्यात आली असल्याचे दिसून येते. अपीलकार सुनावणीकरिता अनुपस्थित होते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २५.०५.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२५२६/०२**

**श्री.सुर्यकांत भिमरावजी धोटे**
**प्लॉट नं.१६९, गरोबा मैदान, कापसी चौक,**
**जुना बगडगंज, नागपूर ४४० ००८.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा संचालक**
**पुरातत्व व वस्तु संग्रहालय विभाग,**
**सेंट जॉर्ज हॉस्पीटल परिसर,**
**सीएसटी रोड, मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**अभिरक्षक, मध्यवर्ती संग्रहालय,**
**सिव्हील लाईन, नागपूर.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.सुर्यकांत धोटे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.०३.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दिनांक १५.०५.२००९ रोजी जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते तसेच अपीलकार उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दिनांक १०.०१.२००८ रोजी अर्ज करुन, मोची पदाकरिता निवड उमेदवारांची संपूर्ण यादी व निवड झालेले श्री.वानखेडे यांचे शिक्षण, जात, प्रशिक्षण अनुभवप्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रतीची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. सदर दोन्ही अधिका-याची कृती निश्चितच योग्य नाही. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास अडिच महिन्याच्या अधिक कालावधीनंतर म्हणजे विलंबाने दि.०६ मे, २००९ च्या पत्रानुसार माहिती दिली. यामुळे उक्त अधिनियमातील कलम ७(१) चा भंग झाला आहे. सदर विलंबास जन माहिती अधिकारी यांना जबाबदार धरुन त्यांच्या विरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अनुसार

दंडात्मक कारवाई का? करु नये, याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३ आठवडयाच्या आत आयोगाकडे प्रत्यक्ष भेटून लेखी खुलासा सादर करावा. अन्यथा नियमानुसार पुढील योग्यती कारवाई येईल. सबब सदर प्रकरणी मी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

<u>**आदेश**</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** | **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २५.०५.२००९** | **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२५३३/०२**

**श्री.पँथर प्रकाश बनसोड**
**सचिव,**
**सिव्हील-हयुमन राईटस प्रोटेक्शन असो.**
**१८०, उंटखाना, मेडीकल कॉलेज रोड,**
**नागपूर ४४० ००९.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**कुलपतीचे सचिव यांचे कार्यालय,**
**राजभवन मलबार हिल,**
**मुंबई ४०० ०३५.**

**जन माहिती अधिकारी,**
**कुलपतीचे सचिव यांचे कार्यालय,**
**राजभवन मलबार हिल,**
**मुंबई ४०० ०३५.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.पँथर प्रकाश बनसोड यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०३.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दिनांक १९.०५.२००९ रोजी जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या कार्यालयातील Video Conferncing रूम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय प्राधिकारी हजर होते. अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दिनांक १६.१०.२००६ रोजी अर्ज करुन, पुढीलप्रमाणे माहिती मागीतली होती.

"राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्र.कुलगुरू हे पूर्ण वेळ अधिकारी म्हणून कार्यरत असतांना ॲकॅडेमीक स्टॅाफ कॉलेज नागपूर विभागावर संचालक पदावर पूर्ण वेळ अधिकारी म्हणून मानधन व मानधनाशिवाय कार्यरत राहता येते काय? याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती."

"जन माहिती अधिका-यांनी दि.१५.११.२००६ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती दिली. सदर माहितीने समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२०.१२.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. जन माहिती अधिका-याने, अपीलकारास दिलेल्या माहितीचे समर्थन करुन दि.१२ जानेवारी, २००६ च्या पत्रान्वये अपीलकारास प्रथम अपिलीय अधिका-यांनी उत्तर दिले. व्दितीय अपीलावरील सुनावणीकरिता अपीलकार असता अपीलकारास माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे."

**आदेश**

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २६.०५.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२५३५/०२**

**श्री.अनिल बाबुलाल कांबळे**
**उपसंचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य,**
**उद्योग भवन, ६ वा माळा, सिव्हील लाईन्स,**
**नागपूर ४४० ००१. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**उद्योग, उर्जा व कामगार विभाग,**
**(कामगार) मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**उद्योग, उर्जा व कामगार विभाग,**
**(कामगार) मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.अनिल बाबुलाल कांबळे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.०६.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दिनांक १९.०५.२००९ रोजी जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते.

उप संचालक औद्योगिक सुरक्षा व आरोग्य या पदाची सन २००५ ते २००८ ची अद्यावत व अंतिम जेष्ठता यादीची अपीलकाराने मागणी केली होती. औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाच्या उपसंचालक संवर्गाची जेष्ठतासूची तयार करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. सदर जेष्ठतासूची अंतिम होताच अपीलकारास पाठविण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०१.०४.२००८ रोजी कळविले होते. उप संचालक, गट-अ या संवर्गातील अधिका-यांची दि.०१.०१.२००४ रोजीची तात्पुरती जेष्ठतासूची तयार करण्यात आली आहे. त्यासंदर्भात संबंधीत अधिका-याकडून आक्षेप मागविण्यात आले आहेत. सदर आक्षेपाची छाननी करून जेष्ठतासूची तयार करण्यात आली आहे. त्यापुढील वर्षाची जेष्ठतासूची अंतिम करण्यासंदर्भात एका उपसंचालकाने महाराष्ट्र प्रशासकीय

न्यायधिकरणामध्ये रिट याचिका दाखल केली होती. सदर जेष्ठतासूची ऑगष्ट २००९ पर्यंत अंतिम करण्याबाबत न्यायधिकरणाने आदेश दिले असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन जेष्ठतासूची उपलब्ध नाही. मॅटच्या आदेशानुसार ऑगष्ट २००९ पर्यंत जेष्ठतासूची अंतिम करण्यात येणार आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, उपसंचालक संवर्गाची जेष्ठतासूची अंतिम होईल तेव्हा जेष्ठतासूचीची प्रत सत्वर अपीलकारास पुरविण्यात यावी.

## आदेश

सबब अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २६.०५.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२००९/२३२/०२**

**श्री.रमेश शंकरराव पावर**
**प्रकार-सी, ५/२, शासकीय वसाहत,**
**रवीनगर, नागपूर ४४० ००१. .... तक्रारदार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**रोजगार व स्वयंरोजगार,**
**संचालनालय, कोकण भवन,**
**३ रा मजला, सी.बी.डी, बेलापूर,**
**नवी मुंबई ४०० ६१४.**

**जन माहिती अधिकारी,**
**रोजगार व स्वयंरोजगार,**
**संचालनालय, कोकण भवन,**
**३ रा मजला, सी.बी.डी, बेलापूर,**
**नवी मुंबई ४०० ६१४. .... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.रमेश शंकरराव पवार यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.०१.२००८ रोजी तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीवर जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये दि.१९.०५.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता तक्रारदार हजर होते व गैरतक्रारदार हजर नव्हते.

आयुक्त रोजगार व स्वंयरोजगार यांच्या दि.३० मे, २००६ च्या आदेशानुसार तक्रारदाराची बदली केली. सदर बदलीकरिता सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २७.११.१९९७ च्या परिपत्रकातील तरतुदीनुसार तक्रारदाराच्या बदलीकरिता वरिष्ठांची संम्मती घेण्यात आली होती का? संम्मती घेतली असल्यास संम्मतीच्या कागदपत्राची प्रत तक्रारदाराने मागीतली होती. गैरतक्रारदाराने दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली. सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२७.११.१९९७ च्या परिपत्रकानुसार संबंधीत शासकीय सेवकाची त्या पदावरील विहित

कालावधीची सेवा पूर्ण झाल्याशिवाय बदली करु नये असे आदेश आहेत. तेव्हा सदर आदेशातील तरतुदीनुसार तक्रारदाराच्या सेवेचा विहित कालावधी पूर्ण होण्यापूर्वीच बदली करण्यात आली आहे किंवा कसे याबाबतची सविस्तर माहिती तक्रारदारास, गैरतक्रारदाराने हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत माहिती द्यावी. सबब या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

सबब तक्रार अंशत: मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २६.०५.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२५४४/०२**

**श्री.गोपाल बालाजी झाडे**
**सेवानिवृत्त, दूग्धव्यवसाय विकास अधिकारी (मु.)**
**८, पुरोहीत ले-आउट, अंबाझरी, नागपूर ४४० ०३३.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त,**
**दुग्ध व्यवसाय विकास विभाग,**
**प्रशासकीय इमारत, वरळी, सी फेस,**
**मुंबई ४०० ०१८.**

**जन माहिती अधिकारी,**
**दुग्ध व्यवसाय विकास विभाग,**
**प्रशासकीय इमारत, वरळी, सी फेस,**
**मुंबई ४०० ०१८.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.गोपाल बाजाजी झाडे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०७.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दिनांक १९.०५.२००९ रोजी जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या कार्यालयातील Video Conferncing रूम मध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली. सदर सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०८.१२.२००७ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागीतली होती.

"(१) राजपत्रित अधिका-यांना आगावू वेतनवाढी मंजूर करण्याकरिता दिनांक ३०.०६.२००७ रोजी समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीच्या इतिवृताची प्रत (२) बैठकीकरिता अ, ब, क, ड नमुन्यातील प्रपत्रात तयार केलेल्या माहितीच्या प्रपत्राची प्रत (३) गेल्या ५ वर्षातील गोपनीय अहवालाच्या छायाप्रतीची मागणी केली होती."

गोपनीय अहवालाच्या प्रती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही असा राज्य माहिती आयोगाने तक्रार क्र.२००७/१६०/०२ मध्ये निर्णय दिला असल्याचे नमुद करुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकारास माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दिनांक २३.०१.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे अपीलकाराने व्यथीत होउन राज्य माहिती ओयागाकडे व्दितीय अपील दाखल केले. व्दितीय अपीलाच्या सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली. सदर प्रकरणी मी असे आदेश देतो की, अत्युत्कुष्ट कामगीरीबाबत ज्या अधिका-यांना आगाउ वेतनवाढी मंजूर करण्याची समितीने शिफारस केली आहे त्या इतिवृत्ताची अपीलकारास प्रत द्यावी. अथवा आगाउ वेतनवाढी मंजूर करण्याकरिता शिफारस करण्यात आलेल्या टिप्पणीची प्रत अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत पुरविण्यात यावी.

## आदेश

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २६.०५.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२००९/२३३/०२**

**डॉ.राजकुमार बाळकृष्ण मेश्राम,**
**४८, गिरीजा, विवेकानंदनगर,**
**नागपूर ४४० ०१५.** **.... तक्रारदार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा संचालक**
**वैद्यकिय शिक्षण व संशोधन संचालनालय,**
**शासकीय दंत वैद्यक महाविद्यालय व हॉस्पीटल इमारत,**
**सेंट जार्ज हॉस्पिटल कंपाउंड, मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**वैद्यकिय शिक्षण व संशोधन संचालनालय,**
**शासकीय दंत वैद्यक महाविद्यालय व हॉस्पीटल इमारत,**
**सेंट जार्ज हॉस्पिटल कंपाउंड, मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार डॉ.राजकुमार बाळकृष्ण मेश्राम, नागपूर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये राज्य माहिती आयेगाकडे दि.२०.०५.२००८ रोजी तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीवर जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या कार्यालयातील Video Conferncing रुम मध्ये दि.१९.०५.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सदर सुनावणीकरिता तक्रारदार हजर होते.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात दि.०४.१२.२००७ रोजी गैरतक्रारदाराकडे अर्ज करुन खालील माहिती मागीतली होती.

तातपुरत्या स्वरुपात अथवा कायमस्वरुपी, सहयोगी प्राद्यापक, सुक्ष्मजीवशास्त्र या पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव याबाबतची माहिती तसेच सहयोगी प्राद्यापक, सुक्षम जिवशास्त्र डॉ.व्ही.आर.शेगोकार यांनी धारण केलेली शैक्षणिक अर्हता याबाबत माहिती मागीतली होती.

गैरतक्रारदाराने विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने दि.०२.०२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. त्यांनतर गैरतक्रारदाराने दि.१८.०२.२००८ च्या पत्रान्वये तक्रारदारास मुध्देनिहाय माहिती दिली. सदर माहितीचे अवलोकन केले असता, सहयोगी प्राद्यापक, सुक्ष्मजीवशास्त्र या

पदासाठी भारतीय आयुविज्ञान परिषद, नवी दिल्ली यांनी विहित केलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव याबाबतच्या अधिनियामाची प्रत तक्रारदारास पुरविण्यात आली असल्याचे दिसून आले. सहयोगी प्राद्यापक डॉ.व्ही.आर.शेगोकार यांची शैक्षणिक अर्हता तसेच सहयोगी प्राद्यापक, सुक्ष्मजीवशास्त्र या पदावर तदर्थ पदोन्नतीसाठी डॉ.शेगोकार यांची विभागीय पदोन्नती समितीने शिफारस केलेल्या टिप्पणीची प्रत उपलब्ध करुन देण्याची गैरतक्रारदाराने तयारी दर्शविली असल्याचे दिसून येते. यावरुन गैरतक्रारदाराने तक्रारदाराच्या मागणीनुसार माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. तरीही तक्रारदाराच्या काही ग्रा-हाण्याचे निवारण झाले नसेल तर त्यांनी त्याकरिता सक्षम प्राधिकरणाकडे दाद मागावी. माहितीचा अधिकार अधिनियमातंर्गत सुधारात्मक कारवाई (Remedical action) अनिवार्य नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

सबब तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २७.०५.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**